# आकाशवाणी नागपूर,
# प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
# शनिवार, दिनांक १३ जुलै २०२४

## ठळक बातम्या

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मुंबईत आगमन; ५२ हजार ३०० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या विविध प्रकल्पांचं करणार भूमिपूजन आणि लोकार्पण.
2. राज्य भूमी अभिलेख विभागाच्या सरळसेवा भरती 2021 ची सुधारित प्रतीक्षा यादी प्रसिध्द; कागदपत्र पडताळणी १५ जुलै रोजी होणार.
3. शिक्षण जीवनात नवीन ऊर्जा आणते-केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे नागपूरात प्रतिपादन.

आणि

4. महायुती सरकारच्या आर्थिक बेशिस्तीमुळे, राज्याच्या प्रगतीवर प्रतिकूल परिणाम - कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंची टीका.

****

पंतप्रधान दौरा

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मुंबईत गोरेगाव नेस्को प्रदर्शन केंद्र येथील कार्यक्रम स्थळी पोहोचले असून याप्रसंगी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे राज्यपाल रमेश बैस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित आहेत. पंतप्रधानांच्या हस्ते ५२ हजार ३०० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या विविध प्रकल्पांचं भूमिपूजन आणि लोकार्पण होणार आहे. गोरेगाव इथल्या नेस्को प्रदर्शन केंद्रात रस्ते, रेल्वे आणि बंदर क्षेत्राशी संबंधित २९ हजार ४०० कोटी रुपये खर्चाच्या प्रकल्पांचं लोकार्पण आणि पायाभरणी मोदी यांच्या हस्ते होईल. गोरेगाव- मुलुंड रस्त्यावरचा जुळा बोगदा, ठाणे - बोरिवली दरम्यानचा बोगदा तसंच, नवी मुंबईत तुर्भे इथं कल्याण यार्ड रिमॉडेलिंग आणि गती शक्ती मल्टी मॉडेल कार्गो टर्मिनल या प्रकल्पांची पायाभरणी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होईल. त्यानंतर प्रधानमंत्री लोकमान्य टिळक टर्मिनसवरच्या नवीन फलाटाचं लोकार्पण करतील. मुख्यमंत्री युवा कार्य शिक्षण योजनेचं उद्‌घाटन देखील प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार असून संध्याकाळी ते इंडीयन न्यूजपेपर सोसायटीच्या नव्या इमारतीचं उद्‌घाटन करतील.

निती आयोग

नीति आयोगानं काल २०२३-२४ साठीचा **SDG** इंडिया इंडेक्स अर्थात शाश्वत विकास उदिष्ट निर्देशांक जारी केला. नीति आयोगाचे मुख्य कार्यकारी आधिकारी बी व्ही आर सुब्रह्मण्यम आणि नीतिआयोगाचे उपाध्यक्ष सुमन बेरी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा निर्देशांक जारी करण्यात आला. जागतिक पातळीवर प्रतिकूल परिस्थिती असूनही भारत शाश्वत विकास उद्दिष्टांकडे प्रगती करत आहे, २०१८ मध्ये ५७ आणि २०२०-२१ मध्ये ६६ वरून हा निर्देशांक २०२३-२४ मध्ये ७१वर गेला आहे.

प्राप्तीकर

प्राप्तिकर विभागानं २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी ६ लाख ४५ हजार कोटी रुपयांहून अधिक प्रत्यक्ष कर संकलन केलं आहे तसंच या महिन्याच्या ११ तारखेपर्यंत ७० हजार ९०२ कोटी रुपयांचा परतावा जारी केला आहे. एकूण संकलनात २ लाख ६५ हजार ३३६ कोटी रुपये कॉर्पोरेट कर, ३ लाख ६१ हजार ८६२ कोटी रुपये वैयक्तिक प्राप्तिकर आणि १ हजार ४२६ कोटी रुपये इतर करांचा समावेश असल्याचं प्राप्तिकर विभागानं जारी केलेल्या आकडेवारीत म्हटलं आहे.

प्रतिक्षा यादी

भुमी अभिलेख विभागाच्या सरळसेवा भरती **2021**ची सुधारित प्रतीक्षा यादी प्रसिध्द झाली असून कागदपत्र पडताळणी **15** जुलै रोजी होणार आहे. उपसंचालक भूमी अभिलेख, नागपूर विभागातील गट क पदसमुह **4** (भूकरमापक तथा लिपीक) संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता **28** एप्रिल **2023** रोजी निवडसूची आणि प्रतिक्षायादी प्रसिध्द करण्यात आली होती. सदर यादीवर काही उमेदवारांचे आक्षेप अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यामुळे जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, यांच्याकडील प्राप्त निर्देशान्वये नागपूर विभागातील **28** जून **2024** रोजीची सुधारित प्रतिक्षायादी रद्द करण्यात आली असून **8** जुलै **2024** रोजी सुधारित प्रतीक्षायादी प्रसिध्द करण्यात आली आहे. उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी सोमवार **15** जुलै रोजी सकाळी **11** ते सायंकाळी **5** वाजेपर्यंत उपसंचालक भूमि अभिलेख, नागपूर प्रदेश, नागपूर यांचे कर्यालय, जुने सचिवालय ईमारत, खोली क्रमांक **17**, सिव्हील लाईन्स, नागपूर इथं होणार आहे असं भुमि अभिलेख विभागाचे उपसंचालक विष्णू शिंदे यांनी कळविलं आहे.

गडकरी

शिक्षण हे जीवनात नवीन ऊर्जा आणते असं  प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपूर इथं   केले. प्रोग्रेसिव्ह मागासवर्गीय शिक्षण संस्था नागपूर आणि मातोश्री अनुसया महिला बहुद्देशीय संस्था नागपूरच्या वतीनं उत्तर नागपूरच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉन्व्हेंशन सेंटर इथं गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता त्यावेळी ते बोलत होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांनी दलित पीडित, शोषित समाजामध्ये शिक्षेचा प्रसार करण्यासाठी आपल्या जीवनाला समर्पित केलं. शिक्षण आणि शिक्षा खूप महत्वपूर्ण आहे ज्यामुळे आपलं जीवन बदलु शकत. गरिबी, उपासमार आणि बेरोजगारी बदलू शकते. समाजात आपली मान्यता आणि आदर यात वाढ होते असंही ते म्हणाले.  यावेळी केंद्रीय मंत्री  गडकरी यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र आणि स्मृती चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

नाना पटोले

महायुती सरकारच्या अनागोंदी कारभारावर कॅगनं गंभीर ताशेरे ओढल्याने सरकारच्या मोठमोठ्या दाव्यातील हवा निघाली आहे. राज्यावरचा ८ लाख कोटी रुपयांचा कर्जाचा डोंगर चिंताजनक असून पुरवणी मागण्या आणि कर्जाचं सरकार समर्थन करत असले तरी कॅगने सरकारला इशारा दिला आहे. तसाच इशारा विरोधी पक्षांनी महाभ्रष्टयुती सरकारला दिला होता परंतु विरोधकांच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष  करत असलेल्या सरकारला कॅगने चपराक लगावली आहे. कॅगने राजाच्या आर्थिक बेशिस्तीवरच बोट ठेवले आहे. महायुती सरकारने राज्याला दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर पोहचवलं असल्याची टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. मागील दोन वर्षात या सरकारनं तब्बल २.५ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्ज काढल्याने राज्यावर ८ लाख कोटी रुपयांचे कर्ज झाले आहे. कर्जाचे हे प्रमाण राजकोषीय स्थूल उत्पन्नाच्या १८.७३ टक्के आहे. राजकोषीय कायद्यातील तरतुदीपेक्षा हे प्रमाण जास्त आहे. पुरवणी मागण्यावर सरकारला सभागृहातच जाब विचारणार होतो पण सत्ताधारी पक्षाने जाणीवपूर्वक गोंधळ घालून, गोंधळातच चर्चेविना बहुमताच्या जोरावर या मागण्या मंजूर करुन घेतल्या, असा आरोप पटोले यांनी केला.

मेळघाट पर्यटन

विदर्भाचं नंदनवन असलेलं मेळघाटातील चिखलदरा आणि  धारणी तालुक्यातील अनेक धबधबे ओसंडून वाहत असल्यानं बहरलेले निसर्ग सौंदर्य बघण्यासाठी पर्यटकांची पावलं आता मेळघाटच्या दिशेने वळु लागली आहे. जुलै महिन्यात झालेल्या समाधानकारक पावसाने मेळघाटातील जव्हारकुंड, मकादरी, चीचाटी, भीमकुंड आधी धबधब्यांचे निसर्ग सौंदर्य पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी मेळघाटच्या दिशेने होत आहे.यासोबतच सेमाडोह, चिखलदरा, कोलकास आणि आम्झरी इथं असलेलं निसर्ग पर्यटन आणि  साहसी खेळ अनुभवण्यासाठी तरुण मोठ्या संख्येनं येत आहे. येणाऱ्या काळात पडणाऱ्या पावसाप्रमाणे हे निसर्ग सौंदर्य अनुभवणाऱ्यांची सुद्धा गर्दी मेळघाटात होण्याची शक्यता आहे त्यासाठी जिल्हा प्रशासनानं विविध स्तरावर तयारी केली असून शनिवार आणि  रविवारी वाहतुकीसाठी वेगळ्या मार्गाची व्यवस्था सुद्धा करण्यात आली आहे.

वर्धा जिल्हा निर्यात

वर्धा जिल्ह्यातील कृषि उत्पादनावर आधारित उद्योग व्यवसायिकांनी आपल्या मालाची निर्यातक्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न करावे. निर्यात क्षमता वाढविण्याकरीता परकीय  व्यापार संचलनालय- डीजीएफटी वर रजिस्ट्रेशन करण्याकरीता येणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी प्रशासनाच्या वतीनं मदत करण्यात येईल, असं प्रतिपादन वर्धा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी ईग्नाईट महाराष्ट्र कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी केले. जिल्ह्यात रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्या तसेच उद्योजकांना येणाऱ्या अडचणी, शासनाच्या औद्योगिक विकास धोरणाची माहिती होण्यासाठी विकास भवन इथं उद्योजकांसाठी ईग्नाईट महाराष्ट्र एकदिवसीय कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं होत, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी नागपूर उद्योग विभागाचे सहसंचालक गजेंद्र भारती, डी जी एफ टी च्या सहाय्यक स्नेहल ढोके,  यांच्यासह विविध उद्योजक, अधिकारी उपस्थित होते.

धान्य खरेदी

गोंदिया जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांकडून रब्बी हंगामात केलेल्या खरेदीची रक्कम अदा करण्यासाठी ६५ कोटी रुपयांचा निधी जिल्हा विपणन महासंघाच्या खात्यात रक्कम वर्ग केला गेला आहे. यानंतर आता येत्या सोमवार पासून धान्याच्या खरेदीचा परतावा संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात हस्तांतरीत केला जाणार आहे.

डॉ.परिणय फुके

विधान परिषदेच्या निवडणुकीत भंडारा-गोंदियाचे माजी पालकमंत्री डॉ.परिणय फुके यांनी २६ मतं घेत विजय मिळविला. त्यांच्या विजयाचा जल्लोष भाजप पदाधिकाऱ्यांनी गोंदिया शहरातील जयस्तंभ चौक इथं केला. गोंदिया जिल्ह्यांचे माजी पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी गोंदिया जिल्ह्याच्या पालकमंत्री पद सोडल्यानंतर आता परिणय फुके यांना गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री पद देण्यात यावे अशी मागणी भाजप कार्यकर्त्यांनी केली आहे.

निरी व्याख्यान

नागपूरच्या वर्धा रोड स्थित राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था निरी च्या वतीन **15** जुलै सोमवार रोजी सकाळी ११.३० वाजता डॉ.अशोक जुवारकर स्मृती व्याख्यानाचं आयोजन करण्यात आलं असून मध्य प्रदेशच्या डॉ. हरिसिंग गोर विद्यापीठाचे वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. एम. एल .खान हे याप्रसंगी व्याख्यान देतील . या व्याख्याना प्रसंगी 'ट्रीज अँड ट्री मायक्रो हॅबिटॅट ऑफ सी एस आय आर निरी नागपूर' या पुस्तकाचं देखील प्रकाशन करण्यात येणार आहे.

पोटनिवडणुक

सात राज्यांच्या 13 विधानसभा मतदारसंघांसाठी बुधवारी झालेल्या पोटनिवडणुकीचे पहिले 11 निकाल जाहीर झाले आहेत. काँग्रेसने चार जागा जिंकल्या आहेत, तर अखिल भारतीय तृणमूल काँग्रेसच्या उमेदवारांनी तीन जागा जिंकल्या असून एका जागेवर आघाडी घेतली आहे. उर्वरित दोन मतदारसंघांसाठी मतमोजणी सुरू आहे. पंजाबमध्ये सत्ताधारी आम आदमी पक्षानं जालंधर पश्चिम राखीव विधानसभेची जागा जिंकली आहे. हिमाचल प्रदेशात सत्ताधारी काँग्रेसनं दोन तर भाजपला एक जागा मिळाली. पश्चिम बंगालमध्ये सत्ताधारी अखिल भारतीय तृणमूल काँग्रेसने रायगंज, राणाघाट दक्षिण आणि बागडा या जागा जिंकल्या. मध्यप्रदेशात अमरवारा जागेवर भाजपचे उमेदवार कमलेश प्रताप शहा विजयी झाले आहेत. बिहारमध्ये, अपक्ष उमेदवार शंकर सिंह यांनी रुपौली विधानसभेची जागा 8211 मतांच्या फरकाने जिंकली आहे आणि त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी आणि **JD(U)** चे उमेदवार कलाधर प्रसाद मंडल यांचा पराभव केला आहे.

*****